MHAH250026142022

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दि. | : | १०/१०/२०२२ |
| खटला नोंदणी दि. | : | १०/१०/२०२२ |
| निकालाचा दि. | : | २९/०४/२०२५ |
| कालावधी | : | २ व. ०६ म. १९ दि. |

**भाग अ**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. ३), पारनेर, ता. पारनेर,**

**जि. अहमदनगर यांचे न्यायालय**

(**पिठासीन अधिकारीः निलेश श्रीपाल सबनीस**)

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक ३६६/२०२२** **निशाणी क्र.३४**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>पारनेर पोलीस स्टेशन, ता. पारनेर, जि. अहमदनगर. |
| **अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ** | | | श्री. एन. एस. भिंगारदिवे. |
| **विरूध्द** | | | |
| **आरोपी** | | १. | बबन दशरथ जाधव,<br>वय–६० वर्षे, व्यवसाय–शेती, |
| | | २. | गोरख उर्फ पिंटु बबन जाधव,<br>वय–३० वर्षे, व्यवसाय–शेती, |
| | | ३. | अशोक बबन जाधव,<br>वय–४२ वर्षे, व्यवसाय–शेती, |
| | | ४. | चांगुणाबाई उर्फ विठाबाई बबन जाधव,<br>वय–५५ वर्षे, व्यवसाय–शेती, |

| | | | |
|---|---|---|---|
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | | श्री. जी. पी. कावरे |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २७/०५/२०२० |
| गुन्हा दाखल दिनांक | २८/०५/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १०/१०/२०२२ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | २१/०९/२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १६/०४/२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | २९/०४/२०२५ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २९/०४/२०२५ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | — |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालय ◌ीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बबन दशरथ जाधव | २९/०५ /२०२० | २९/०५ /२०२० | भा.दं.वि.क. ३२५, ३२४, ३३६, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | — | — |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | गोरख उर्फ पिंटु बबन जाधव | २९/०५/२०२० | २९/०५/२०२० | वरिलप्रमाणे | निर्दोष | — | — |
| ३. | अशोक बबन जाधव | २९/०५/२०२० | १६/१०/२०२३ | वरिलप्रमाणे | निर्दोष | — | — |
| ४. | चांगुणाबाई उर्फ विठाबाई बबन जाधव | २९/०५/२०२० | १६/१०/२०२३ | वरिलप्रमाणे | निर्दोष | — | — |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | विकास कुशाबा भले | फिर्यादी | २९ |
| २. | प्रकाश कुशाबा भले | साक्षीदार | ३१ |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| ३० | फिर्यादी |
| ३२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३३ | विकास कुशाबा भले यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

### ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

### क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

### ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | -- | --- |

## न्यायनिर्णय

( दि. २९/०४/ २०२५ रोजी घोषित )

उपरोक्त आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम (यापुढे थोडक्यात भा.दं.सं.) ३२५, ३२४, ३३६, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांकरीता खटला चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे**,

फिर्यादी विकास कुशाबा भले (यापुढे उल्लेख 'फिर्यादी' असा) रा.पळशी, माळवाडी, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांनी फिर्याद दिली की, दि.२७/०५/२०२० रोजी रात्री ७.०० वा.चे सुमारास पळशी ते माळवाडी जाणारे रोडने माळवाडी शिवारातुन फिर्यादीचे मोटरसायकल नं.एम एच १६ ए बी ७६०३ हिवरुन पळशीकडुन माळवाडीकडे घरी जात असताना काका बबन दशरथ जाधव याचे घराजवळ रोडवर दगड टाकलेले होते म्हणुन त्यांना मोटार सायकल जाणे करीता रस्ता करुन ते दगड बाजुला टाकले व घरी गेलो, व घराकडुन परत रात्री ७.३० वा.चे. सुमारास फिर्यादीचे मोटरसायकल वरुन त्याच रोडने मोठया बहिणीकडे जात असताना व ज्या ठिकाणी दगड टाकलेले होते त्या ठिकाणी पोहचलो असता फिर्यादीचा काका बबन दशरथ जाधव व मावस भाऊ अशोक बबन जाधव, मावशी चांगुणाबाई बबन जाधव सर्व रा. माळवाडी पळशी ता.पारनेर हे तेथे आले व त्यांनी तु रस्त्यावरुन दगड का काढले असे म्हणुन शिवीगाळ करुन फिर्यादीला लाथाबुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली त्याचवेळी काका बबन दशरथ जाधव याने हातात दगड धरुन फिर्यादीच्या तोंडावर मारल्याने फिर्यादीच्या वरील मधला दात पडुन रक्कत येवु लागले तेव्हा फिर्यादीचा भाऊ प्रकाश यास फोन करुन तेथे बोलावुन घेतले असता त्याचे डोक्यात मावशी विठाबाई उर्फ चांगुनाबाई बबन जाधव हिने दगड मारुन त्यास दुखापत केली असुन त्या सर्वांनी मिळुन फिर्यादीच्या मोटरसायकल वर दगड घालुन फिर्यादीच्या मोटरसायकलचे मोडतोड करुन नुकसान केले आहे व दमदाटी केली आहे. भाऊ प्रकाश कुशाबा भले याचेवर पळशी गावातच डॉ. हिरामण चिकणे यांचेकडे प्राथमिक उपचार केले असुन फिर्यादीने घरगुतीच उपाय केला आहे व फिर्यादीस दावखान्यात जावायाचे आहे. म्हणुन फिर्यादीने सदर फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीवरुन पारनेर पोलीसांनी पोलिसांनी गुन्हा क्र.I–३५२/२०२० भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२५, ३२४, ३३६, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे नोंदवला. गुन्हयाचा तपास

पो.ना/१८१८ प्रितम सुधाकर मोढवे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले आहे. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपींवर नि.क्र.१३ अन्वये भारतीय दंड विधान संहितेचे कलम २५, ३२४, ३३६, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींनी ते नि. क्र.१४ ते १७ अन्वये नाकबूल केले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपींविरूध्द सबळ पुरावा आढळुन न आल्याने आरोपींची जबानी फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ (१) (ब) नुसार नोंदविण्यात आली नाही.

६. सरकारी वकिलांचा युक्तिवाद, आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद, उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन न्यायालयाच्या निदर्शनास खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष खालील कारणांसहीत नोंदविले आहे.

| <u>अ.क्र</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दि.२७/०५/२०२० रोजी रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास माळवाडी, पळशी, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला तोंडावर दगड मारुन गंभीर दुखापत केली ज्यामुळे त्याचे दात निखळले व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क.३२५ सह कलम ३४ प्रमाणे खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही |
| २. | वर नमूद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपींनी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस दगडाने | नाही |

| | | |
|---|---|---|
| | प्राणघातक हल्ला करुन आणि साक्षीदारांना दुखापत केली, जे गुन्हयाचे हत्यार म्हणुन वापरलेले साधन आहे व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क.३२४ सह कलम ३४ खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का? | |
| ३. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी यांनी आपसात संगनमत करुन साक्षीदार यांना दगड फेकुन मारुन मानवी जिवन व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयीगयीने कृती केली व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क.३३६ सह कलम ३४ खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| ४. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला लाथाबुक्याने मारहाण करुन दुखापत केली व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क.३२३ सह कलम ३४ खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| ५. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांची ताब्यातील क्रमांक एम एच १६ एम बी ७६०३ या मोटारसायकलचे जाणीवपुर्वक नुकसान करुन आगळीक केली व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क.४२७ सह कलम ३४ खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का? | नाही |
| ६. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना | नाही |

| | | |
|---|---|---|
| | शिवीगाळ केली व त्यानुसार त्यांचे हातुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा त्यांच्या हातुन कुठला गुन्हा घडावा असा त्यामागचा आरोपींचा हेतु होता व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क.५०४ सह कलम ३४ खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का? | |
| ७. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन फौजदारी धाकदपटशा केला व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.क. ५०६ सह कलम ३४ खाली गुन्हा केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही |
| ८. | आदेश काय? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

७. आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे निशाणी क्र.२९ वर सा.क्र.१ फिर्यादी विकास कुशाबा भले, निशाणी क्र.३१ वर साक्षीदार क्र.२ प्रकाश कुशाबा भले यांचा जबाब नोंदवला.

८. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, योग्य त्या गुणदोषांवर सदर केसचा निकाल व्हावा. आरोपींतर्फे त्यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, आरोपींविरुध्द सदर केसमध्ये कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही व फिर्यादी व आरोपींमध्ये तडजोड झालेली आहे. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत.

## <u>मुद्दा क्र. १ ते ७ करीता–</u>

सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचा ऊहापोह एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

९. सरकार पक्षाची कथने पाहता फिर्यादी हा महत्वपूर्ण साक्षीदार आहे. फिर्यादी विकास कुशाबा भले सा.क्र.१ यांच्या निशाणी क्र.२९ वरील कथनांनुसार आरोपी त्यांचे नातेवाईक आहे. घटना कोणत्या तारखेला घडली व किती वाजता घडली हे आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. घटना माळवाडी परिसरात घडली. त्या दिवशी किरकोळ वाद झाले होते. त्यांना व त्यांच्या भावाला आरोपींनी दगडाने मारहाण केली नसल्याचे सांगितले आहे. त्यांना फिर्याद दाखविण्यात आली असता त्यावरील सही त्यांची असल्याचे व फिर्याद त्यांना वाचुन दाखविण्यात आली नसल्याचे त्यांनी सांगितले. फिर्यादी मध्ये काय लिहिले हे त्यांना माहित नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. फिर्यादीस सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता त्यामधुन अभियोग पक्षास सहाय्यभुत ठरेल असा पुरावा आलेला नाही.

११. सा.क्र.२ प्रकाश कुशाबा भले यांच्या नि.३१ वरील कथनानुसार आरोपी त्यांचे नातेवाईक आहे. फिर्यादी त्यांचा भाऊ आहे. घटना किती तारखेला घडली हे आठवत नाही. त्यांना व त्यांच्या भावाला आरोपींनी दगडानी मारहाण केली नसल्याचे सांगितले. पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर साक्षीदारास सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता त्यामधुन अभियोग पक्षास सहाय्यभुत ठरेल असा पुरावा आलेला नाही.

१४. वरील फिर्यादी व साक्षीदाराचा पुरावा पाहता फिर्यादी व साक्षीदारानी त्यांच्या सरतपासात आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस व साक्षीदाराला दगडाने मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली, असे कुठेही कथन केलेले नाही. फिर्यादीच्या उलटतपासात आरोपी बबन याने फिर्यादीस लाथा बुक्यांनी मारहाण

करुन व तोंडावर दगड मारुन त्यांच्या दात पाडला असल्याचे व त्यांच्या भावास आरोपी क्र.४ चांगुणाबाई हिने दगड फेकुन त्यास दुखापत केली असल्याचे त्यांनी नाकारले आहे. फिर्यादमध्ये अधोरेखांकीत भाग–अ फिर्यादीस वाचुन दाखवण्यात आला असता तो मजकुर पोलीसांनी का लिहीला याचे कारण त्यांना सांगता येत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच साक्षीदार प्रकाश कुशाबा भले यांनी उलटतपास नाकारले आहे की, त्यांच्या भावास आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण करुन व तोंडावर दगड मारुन त्यांच्या भावाचा दात पाडला होता व त्यांनी नाकारले आहे की, आरोपी क्र.४ चांगुणाबाई यांनी दगड फेकुन त्यांना दुखापत केली होती. सदर साक्षीदारास त्यांच्या जबाबामधील अधोरेखांकीत भाग–अ वाचुन दाखवण्यात आला असता तो मजकुर पोलीसांनी का लिहीला याचे कारण त्यांना सांगता येत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

१६. जरी आरोपींनी नि.३२ वरील घटनास्थळ पंचनामा, नि.३३ वरील फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्रामधील मजकुर मान्य केला असला तरी फिर्यादी व साक्षीदाराचा संपुर्ण पुरावा पाहता त्यामध्ये आरोपींनी फिर्यादीस व साक्षीदार यांना दगडाने मारहाण झाल्याचे व फिर्यादीला लाथा बुक्यांनी मारहाण केल्याचे व दगडाने तोंडावर मारुन फिर्यादीचा दात पाडला असल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदरील पुरावा अभियोगपक्षास सहाय्यभुत ठरत नाही. ज्यावेळी थेटपुराव्यामध्येच विसंगती व त्रुटी असतील व तोच पुरावा सबळ नसेल तर केवळ पुरक पुराव्याच्या आधारावर गुन्हा संशयापलिकडे शाबीत होत नसतो. एकंदरीत सर्व साक्षीदारांचा पुरावा पाहता भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२४, ३३६, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हयांमधील घटक अभियोगपक्षाने संशयापलिकडे सिध्द केलेले नाही. सबब सदरची केस आरोपींविरुध्द संशयापलिकडे सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी देत आहे. मुद्दा क्र.१ ते ७ वर नोंदविलेले निष्कर्ष विचारात घेता, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द केस सिध्द केलेली नाही असे माझे मत आहे. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्र.८ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. आरोपी क्र.१ ते ४ यांना भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२५, ३२४, ३३६, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र.१ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार रुपये १५,०००/– चे बंधपत्र व त्याच रक्कमेचा जामीन देण्याची पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.05.02 17:30:22 +0530

( निलेश श्रीपाल सबनीस )

दि. २९/०४/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

न्यायालय क्र.३, पारनेर